कामगार विभाग-ब/४/ककनिस/३३वी बैठक/३०५९
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
प्रकाशगड, प्लॅाट नं.जी-९, बांद्रा (पूर्व),
मुंबई-४०० ०५१.
दि.२३.१.२००१

# परिपत्रक

**विषय:** कर्मचारी कल्याण निधी समिती -
- अधिकारी/कर्मचारी यांच्या पाल्यांना देण्यात येणा-या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करणेबाबत.

कर्मचारी कल्याण निधी समितीच्या दि.२६.१२.२००० रोजी झालेल्या ३३व्या (तेहतीसाव्या) बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

मंडळाचे अधिकारी/कर्मचारी यांच्या माध्यमिक शालांत परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या पाल्यांना सध्या मिळत असलेल्या रु.१००/- ऐवजी रु.२००/- व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या पाल्यांना रु.२००/- ऐवजी रु.४००/- दरमहा देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

तसेच कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ३२व्या (बत्तीसाव्या) बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार ज्या पाल्यांनी एस.एस.सी. नंतर पदविका अभ्यासक्रमात प्रवेश घेतल्यानंतर पदविका द्वितीयवर्ष उत्तीर्ण होऊन तृतीय वर्षात प्रवेश घेतला असल्यास त्यांना रु.२००/- ऐवजी रु.४००/- दरमहा देण्यात यावेत.

ही वाढ सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून लागू होईल व त्याप्रमाणे वाढीव दराच्या शिष्यवृत्तीच्या फरकाची रक्कम देण्यात यावी.

सदस्य/सचिव, कर्मचारी कल्याण निधी समिती
व
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रति,
कार्यकारी अभियंता व तत्सम
यांच्या पातळीपर्यंत सर्वांना